महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

**सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५**

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत कान्हेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

---

**क्र. पीआर-३/कृषी संजीवनी-२०१४/३७८२७** **दिनांक :२०.१२.२०१४.**

## वाणिज्य परिपत्रक क्र. २३४

**विषय :- कृषी ग्राहकांकडील वीज बिल थकबाकीमध्ये सवलत देण्यासाठी "कृषी संजीवनी योजना-२०१४" ला मुदतवाढ देण्याबाबत.**

**संदर्भ :- १) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८/ऊर्जा-५ दि.१९.६.२०१४.**
**२) वाणिज्य परिपत्रक क्र.२२३ दि.२०.०६.२०१४.**
**३) पत्र क्र. पीआर-३/कृषी संजीवनी-२०१४/२७१०३ दि.२८.०८.२०१४.**
**४) शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८/ऊर्जा-५ दि.११.०९.२०१४.**
**५) वाणिज्य परिपत्रक क्र.२२९ दि.१२.०९.२०१४.**
**६) शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१४८ (भाग-१)/ऊर्जा-५ दि.१९.१२.२०१४.**

वरील संदर्भातील क्र. १ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र.२ च्या वाणिज्य परिपत्रकाद्वारे "कृषी संजीवनी योजना-२०१४" राबविण्यात येत होती. या योजने अंतर्गत प्रथम हप्ता किंवा ५०% मुळ थकबाकी एकरकमी भरण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०१४ पर्यंतच होती व त्याच बरोबर चालू वीज देयकांचा भरणा करणे क्रमप्राप्त होते.

या योजने अंतर्गत कृषी ग्राहकांनी त्यांच्या ३१.०३.२०१४ पर्यंतची मुळ थकबाकी रकमेची ५०% मुळ थकीत रक्कम भरली तर उरलेली ५०% मुळ थकीत रक्कम महाराष्ट्र शासनातर्फे महावितरणला अनुदान स्वरुपात देण्यात येणार आहे. तसेच या योजनेमध्ये भाग घेणाऱ्या कृषी ग्राहकांचे ३१.०३.२०१४ रोजी थकीत असलेले पुर्ण व्याज व दंड हे महावितरण कंपनीतर्फे माफ करण्यात येणार आहे.

कृषी संजीवनी योजना -२०१४ ला शासनाचे संदर्भिय पत्र क्र. ४ द्वारे दि.३१.१०.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सर्व क्षेत्रिय कार्यालयांना संदर्भ क्र. ५ च्या वाणिज्य परिपत्रकाद्वारे मुदत वाढीबाबत व योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करणेबाबत सुचित करण्यात आले होते.

शासनाने संदर्भिय शासन निर्णय क्र. ६ नुसार कृषी संजीवनी योजना -२०१४ ला दि.३१.०३.२०१५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सदर मुदतवाढीमुळे योजनेमध्ये पात्र होण्यासाठी कृषी ग्राहकांना दि.३१.०३.२०१४ च्या मुळ थकबाकी रक्कमेच्या ५०% रक्कम दि.३१.०३.२०१५ पर्यंत भरावी लागेल. तसेच १ एप्रिल २०१४ नंतर वितरीत करण्यात आलेल्या चालू वीज देयकांचा भरणा करणे क्रमप्राप्त आहे.

सर्व क्षेत्रिय कार्यालयांना विनंती आहे की, सदर मुदत वाढीबाबत जास्तीत जास्त कृषी ग्राहकांना अवगत करण्यात यावे. जेणेकरुन या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होईल.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे.